अस्तित्वातील रस्त्यांचे खडीकरण व
रुंदीकरण करताना घ्यावयाची दक्षता

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**

**शासन परिपत्रक क्र.आरएमआर- २००५/प्र.क्र-२०१ /(२) रस्ते-१**

**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**दिनांक:- १७ जानेवारी २००६.**

---

## परिपत्रक

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत अस्तित्वातील रस्त्यांची खडीकरणाने व डांबरीकरणाने रुंदीकरणाची व दर्जोन्नती करण्यासाठी कामे प्रगतीत आहेत.

अशा रस्त्यांचे खडीकरणाने रुंदीकरण करताना खालील बाबींचे कनिष्ठ अभियंता/उप अभियंता/कार्यकारी अभियंता यांनी कसोशीने पालन करणे आवश्यक आहे.

१. खडीकरणाचे काम सुरु करण्यापूर्वी रस्त्याचे काटछेद विहीत अंतरावर घेण्यात यावेत.

२. एका वेळेस एकाच बाजूस रुंदीकरणासाठी जास्तीत जास्त २०० मी. पर्यंत खोदकाम करण्यात यावे, जेणेकरुन दुसरी बाजू सुरक्षीत वाहतुकीसाठी उपलब्ध राहील. या बाबतीत निविदेमध्ये दिलेल्या सूचनांचे कसोशीने पालन करावे.निविदा प्रपत्रे तयार करताना कामाच्या क्रमाचा व त्याच वरोबर वाहतूक सुरक्षितेच्या बाबीचा उल्लेख भारतीय रस्ते महासंघाने विनिर्दिष्ट केलेल्या सूचनांनुसार असावा.

३. रुंदीकरणाचे खोदकाम हाती घेण्यापूर्वी डांबरी पृष्ठभागाच्या कडेस व रस्त्याच्या दोन्ही बाजूस भारतीय रस्ते महासभेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार,(आय.आर.सी.एस.पी.५५-२००१) गार्ड स्टोन्स,दर्शक बोर्ड इत्यादी लावण्यात यावेत.

४. काळ्या मातीतून अथवा तत्सम स्वरुपाच्या (expansive soils) भागातून जाणाऱ्या रस्त्याच्या लांबीसाठी डांबरी पृष्ठाच्या कडेस लागून असलेली संपूर्ण बाजू, निविदेतील तरतूदीच्या अधीन राहून, खोदकाम (आवश्यक त्या बेन्चसह) करुन काढण्यात यावी. इतर प्रकारच्या मातीच्या भागातून जाणाऱ्या रस्त्याकरीता किमान रोलरच्या रुंदी एवढे (निविदा व अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार) खोदकाम करण्यात यावे.

५. खोदकाम केल्यानंतर अस्तित्वातील डांबरी पृष्ठभागाच्या कडा योग्य रितीने उभ्या तासून घेण्यात याव्यात, जेणेकरुन रुंदीकरणातील भागाचे खडीकरण व जुन्या रस्त्याचा पृष्ठभाग एकत्रितपणे व्यवस्थित राहील. नवीन रुंदीकरणाचा भाग व जुना रस्ता यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा कमकुवत पडदा/ थर राहणार नाही, याची दक्षता क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी घ्यावी.

६. रुंदीकरणाचे खोदकाम अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे पूर्ण झाल्यानंतर निविदेतील विनिर्देशाप्रमाणे मातीकामाची दबाई करण्यात यावी. ( याकरिता वेगळी बाब निविदेत समाविष्ट करु नये )

७. गोळा करण्यात आलेली खडी विहित मानकाप्रमाणे घेण्यात येवून, गुणनियंत्रणाकरीता आवश्यक तेवढ्या चाचण्या केल्यानंतर व सदर निष्कर्ष समाधानकारक आढळल्यास पसरण्यासाठी घेण्यात यावी. गोळा करण्यात आलेली खडी पसरविण्यापुर्वी मोजमापाची संबंधीत उप अभियंता यांनी दुसऱ्या उप अभियंत्यांकडून फेरपडताळणी करुन घ्यावी. (कोणत्या उपविभागाची मापे इतर कोणत्या उपविभागीय स्तरावरील अधिकाऱ्याने तपासायची आहेत, याचे आदेश संबंधित कार्यकारी अभियंता यांनी वर्षातून ३ वेळा काढावेत व प्रत्येक वेळी सदर अधिकाऱ्याच्या नेमणूकीची शक्यतो पुनरावृत्ती होणार नाही असे पहावे). खडी पसरताना व दबाई करताना स्ट्रेट एज व कॅम्बर प्लेटचा वापर करावा.

८. पसरलेल्या खडीचे कोरडे रोलींग (ड्रॉय कॉम्पॅक्शन) प्रथम करण्यात यावे. निविदेत नमूद केल्याप्रमाणे रोलरचा वापर यासाठी करण्यात यावा. (याबाबत रेडबुक स्पेसीफिकेशन आर.डी.-३२.४,आर.डी-३५.०/एमओएसटी स्पेशीफिकेशन ४०४.३.४-४०४.३.५ पहावे.) रोलर पासेस रजिस्टर मध्ये रोलर पासेसबाबत नोंद वेळोवेळी घेण्यात यावी व कार्यकारी अभियंता यांनी या रजिस्टरची त्यांच्या दौऱ्यात तपासणी करावी. कोरडे रोलींग पूर्ण झाले किंवा कसे हे प्रत्येक लांबीमध्ये (Stretch मध्ये) तपासण्यात यावे. ही बाब तपासण्यासाठी एक लहान खडा दबलेल्या खडीच्या पृष्ठभागावर ठेवून त्यावर रोलर फिरवावा. रोलर फिरविल्यानंतर ज्या वेळेस खडा फुटण्याची प्रक्रिया सुरु होते, त्यावेळेस ड्राय कॉम्पक्शन किंवा कोरडे रोलींग पूर्ण झाले असे समजावे. जर हा खडा खालील थरांमध्ये घुसला तर कोरडे रोलींग झाले नाही असे समजावे. (या संदर्भात रेडबुक स्पेसिफिकेशन आर.डी. ३२.४.२ पहावे)

९. कोरडे रोलींग पूर्ण झाल्यानंतर मुरुम आच्छादन करण्यात यावे या पसरलेल्या मुरुमावर कोरडे रोलींग करण्यात यावे. तद्नंतर रोलींग केलेल्या पृष्ठभागावर पाणी टाकण्यात यावे व पुन्हा रोलींग करावे. ( रेडबुक स्पेसिफिकेशन आर.डी. १२.४.३ पहावे )

१०. खडीकरण पूर्ण झाल्यानंतर २४ तास त्यावरुन वाहतूक वर्दळ होणार नाही, याची क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

११. खडीकरणाच्या एका बाजूचे काम पूर्ण झाल्यानंतरच दुसऱ्या बाजूचे काम हाती घेण्यात यावे.

१२. काम करताना सोडी वर्क, गटर, मातीकाम, खडीकरण व नंतर शोल्डर ड्रेन अशा क्रमाने काम निविदेतील तरतुदीप्रमाणे करण्यात यावे.

१३. खडीकरणाचे काम प्रगतीत असताना संबंधीत रोड कारकून,कनिष्ठ अभियंता,उप अभियंता यांनी दिलेल्या सूचनांचे कटाक्षाने पालन होईल,असे पहावे. खडीकरणाचे काम व्यवस्थित होत आहे याची खातरजमा त्यांच्या स्तरावर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ना.श.उमाटे )
उप सचिव (रस्ते)

प्रत,

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागातील सर्व मुख्य अभियंते
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागातील सर्व अधीक्षक अभियंते,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागातील सर्व कार्यकारी अभियंते,